# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०५/०७/२०२४

**"मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण" योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका अधिकाऱ्यांची बैठक संपन्न**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना महाराष्ट्र शासनामार्फत सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि.०५ जुलै, २०२४ रोजी मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालय विरार येथे महानगरपालिका अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी सदर योजनेची प्रचार व प्रसिद्धी करणे, पात्र लाभार्थी महिलांचे योजनेचे फॉर्म ऑनलाईन भरून घेणे, अपलोड करणे, यासाठी प्रत्येक प्रभाग समिती निहाय विशेष विभाग निर्माण करण्याच्या सूचना यावेळी मा.आयुक्त महोदयांनी अधिकाऱ्यांना दिल्या. याकामी कर्मचारी नियुक्त करणे, नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, प्रभाग समिती निहाय विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन करणे, महानगर पालिका स्तरावर आशा वर्कर, महिला बचत गट यांची मदत घेऊन त्यांचे मार्फत जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे, वार्षिक उत्पन्नाच्या आधारे पात्र लाभार्थी निवडायचे असल्याने तहसील कार्यालयाकडून लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करून घेणे, स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या मदतीने जनजागृती करून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे इ. सूचना यावेळी मा.आयुक्त यांच्या मार्फत बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. सदर बैठकीस मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे व श्री.संजय हेरवाडे, उप-आयुक्त श्रीमती प्रियंका राजपुत, श्री सदानंद पुरव, श्री.समीर भूमकर, श्रीमती विशाखा मोटघरे, प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी श्रीमती भक्ती चौधरी तसेच सर्व प्रभाग समिती सहा.आयुक्त व इतर कर्मचारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील **२१ ते ६५ वयोगटातील** विवाहित, अविवाहित, विधवा, घटस्पोटित, परित्यकत्या आणि निराधार महिला यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार असून पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा रु.१५००/- इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे रु.१५००/- पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र महिला लाभार्थ्यांना **दि.३१ ऑगस्ट, २०२४** रोजीपर्यंत अर्ज करता येईल. या योजनेची पात्रता व अपात्रता शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात आली असून महानगरपालिका कर्मचारी, आशा वर्कर, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका व शासनाच्या इतर विभागांमार्फत पात्र लाभार्थ्यांचे फॉर्म भरून घेण्यात येतील. जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. या योजनेचे फॉर्म विनामूल्य भरण्यात येणार असल्याची नोंद लाभार्थ्यांनी घ्यावी.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**